**FORM B**
**PUBLIC ANNOUNCEMENT**
(*Regulation 12 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016*)

**FOR THE ATTENTION OF THE STAKEHOLDERS OF NANAI DAIRY PRIVATE LIMITED**

| Sl. No. | PARTICULARS | DETAILS |
|---|---|---|
| 1. | Name of corporate debtor | NANAI DAIRY PRIVATE LIMITED |
| 2. | Date of incorporation of corporate debtor | 12/01/2009 |
| 3. | Authority under which corporate debtor is incorporated / registered | ROC Mumbai |
| 4. | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U15209MH2009PTC189530 |
| 5. | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | G - 1, Avishkar Empress, K. W. Chitale Path, Behind Portuguese Church, Dadar (W), Mumbai – 400028, Maharashtra, India. |
| 6. | Date of closure of Insolvency Resolution Process | 13/10/2023 |
| 7. | Liquidation commencement date of Corporate Debtor | 13/10/2023 |
| 8. | Name and registration number of the insolvency professional acting as liquidator | **Mr. Prashant Jain**<br>**Registration No. IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131** |
| 9. | Address and e-mail of the liquidator, as registered with the Board | Add: A501, Shanti Heights, Plot No. 2,3,9B/10, Sector 11, Koparkharine, Thane, Navi Mumbai- 400709<br>Email id: **ipprashantjain@gmail.com** |
| 10. | Address and e-mail to be used for correspondence with the liquidator | SSARVI Resolution Services LLP<br>Add: B-610, BSEL Techpark, Sector 30 A, Opp. Vashi Railway Station, Navi Mumbai – 400703<br>Website: www.ssarvi.com/<br><br>Email: liqnanai@gmail.com |
| 11. | Last date for submission of claims | 12/11/2023 |

Notice is hereby given that the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench has ordered the commencement of the liquidation of the **NANAI DAIRY PRIVATE LIMITED** on 13/10/2023.

The stakeholders of **NANAI DAIRY PRIVATE LIMITED** are hereby called upon to submit their

claims with proof on or before 12/11/2023, to the liquidator at the address mentioned against item No. 10.

The financial creditors shall submit their claims with proof by electronic means only. All other creditors may submit the claims with the proof in person, by post or by electronic means.

**Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.**

In case a stakeholder does not submit its claims during the liquidation process, the claims submitted by such a stakeholder during the corporate insolvency resolution process under the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016, shall be deemed to be submitted under section 38.

SD/-

**Mr. Prashant Jain**
Registration No.: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
Liquidator
In the matter of Nanai Dairy Private Limited

Date: 17/10/2023
Place: Mumbai

# आई-वडिलांना न सांभाळल्यास ग्रामपंचायतीत वारस नोंद नाही

■ रत्नागिरी

**आई-वडिलांना** सांभाळले नाही, त्यांची जबाबदारी मुलांनी नाकारली, तर ग्रामपंचायतीमध्ये वारस नोंद केली जाणार नाही, असा ठराव रत्नागिरीतील उमराठ ग्रामपंचायतीने मंजूर केला. सरपंच जनार्दन आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली ११५ ग्रामस्थांच्या उपस्थितीत काल हा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर वडिलोपार्जित जमीन तातडीची गरज नसल्यास केवळ पैशांच्या लोभापायी परप्रांतीयांना विकू नये, असा ठरावही या बैठकीत संमत करण्यात आला. एखाद्याला जागा विकायची असेल तर त्याने आपल्या जागेतून १० फूट रुंदीचा रस्ता अन्य ग्रामस्थांना वहिवाट करणे सोपे व्हावे म्हणून सोडवा, अशी सूचनाही यावेळी देण्यात आली.

जी मुले, मुली आपल्या आई-वडिलांना सांभाळत नाहीत. त्यांच्या औषधोपचारात हेळसांड करतात. गावाकडे असलेल्या आई-वडिलांना विचारत नाहीत, पैसे पाठवत नाहीत, त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात, अशा मुलांसंदर्भात त्यांच्या आई-वडिलांकडून, नातेवाइकांकडून, शेजाऱ्यांकडून तक्रार आल्यास त्या वृद्ध मातापित्याच्या स्वकष्टार्जित मालमत्तेला किंवा संपत्तीला वारस म्हणून नाव लावण्यासाठी त्यांची मुले आल्यास त्याची नोंद ग्रामपंचायत करणार नाहीत, असे या बैठकीत ठरवण्यात आले.

# नीरा-लोणंद दुहेरीकरणासाठी ९ दिवस पॅसेंजर गाड्या रद्द

■ मिरज

**नीरा-लोणंद** स्थानकादरम्यान ब्लॉक घेऊन रेल्वेमार्ग दुहेरीकरणासाठी विविध तांत्रिक कामे करण्यात येणार आहेत. यासाठी १२ ते २१ ऑक्टोबरदरम्यान ९ पॅसेंजर रेल्वे गाड्या पूर्णपणे रद्द तर काही अंशतः रद्द व काही गाड्या विलंबाने धावणार आहेत. नवरात्र व दसऱ्याच्या काळात रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची गैरसोय होणार आहे.

पुणे विभागात पुणे-सातारा रेल्वे मार्गावरील नीरा-लोणंद स्थानकादरम्यान ब्लॉक घेऊन रेल्वेमार्ग दुहेरीकरणासाठी विविध तांत्रिक कामांसाठी १२ ते २१ दरम्यान काही पॅसेंजर व डेमू गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुणे-फलटण, लोणंद-फलटण व पुणे-सातारा या डेमू गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. २१ व २२ ऑक्टोबर रोजी सुटणारी पुणे-कोल्हापूर एक्स्प्रेस कोल्हापूर ते सातारापर्यंतच धावेल. त्यामुळे ही गाडी पुणे-सातारा-पुणे अशी रद्द राहील. २२ रोजी सुटणारी मुंबई-कोल्हापूर कोयना एक्स्प्रेस छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून नियमित वेळेऐवजी दोन तास उशिरा म्हणजेच सकाळी १० वाजून



४० मिनिटांनी सुटेल. तर कोल्हापूर-मुंबई कोयना एक्सप्रेस छत्रपती शाहू महाराज टर्मिनस कोल्हापूर येथून नियमित प्रस्थानाऐवजी अडीच तास उशिरा म्हणजे सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी सुटेल. ब्लॉकमुळे १५ ते २० ऑक्टोबरदरम्यान सुटणारी कोल्हापूर-पुणे एक्स्प्रेसही विलंबाने धावेल. २१ ऑक्टोबर रोजी चंदीगडहून सुटणारी चंदीगड यशवंतपूर एक्स्प्रेस-पुणे ते सातारादरम्यान विलंबाने धावणार आहे.

# गणेश देवी, मेवाणी, बाविस्करांना पद्मश्री दया पवार स्मृति पुरस्कार

■ मुंबई

**साहित्य,** सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अत्यंत प्रतिष्ठेचा म्हणून ओळखला जाणारा पद्मश्री दया पवार स्मृति पुरस्कार जाहीर झाला असून यंदाच्या पुरस्कारांसाठी ज्येष्ठ साहित्यिक आणि भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी आणि सामाजिक कार्यकर्ते आणि गुजरातचे प्रभावी नेते, मानवी हक्क कार्यकर्ता आणि आमदार जिग्नेश मेवाणी यांची निवड झाली आहे. सोबतच 'काळ्या निळ्या रेषा' या आत्मचरित्रात्मक पुस्तकासाठी चित्रकार राजू बाविस्कर यांना यंदाचा ग्रंथाली पुरस्कृत 'बलुतं' पुरस्कार जाहीर झाला आहे. दया पवार स्मृति पुरस्काराचे यंदाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या सहकार्याने २७ ऑक्टोबर २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नरिमन पॉईंट, मुंबईच्या 'रंगस्वर' सभागृहात ज्येष्ठ संपादक आणि खासदार कुमार केतकर यांच्या अध्यक्षतेखाली दया पवार स्मृती पुरस्कार २०२३ वितरण सोहळा होईल. या सोहळ्यादरम्यान कवी-अभिनेता अक्षय शिंपी यांचे कथाकथन आणि 'झुंड'फेम विपीन तातड आणि माही जी. या रॅप क्षेत्रात सध्या धुमाकूळ घालणाऱ्या कलाकारांचा रॅप सादर होणार आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पत्रकार अलका धुपकर करणार आहेत. यंदाचा हा पंचविसावा पुरस्कार सोहळा असून प्रत्येकी दहा हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# पुराव्यासाठी पतीने पत्नीचे कॉल रेकॉर्ड करणे गोपनीयतेचे उल्लंघन

■ रायपूर

हायकोर्टाचा निर्णय

**एखाद्याचे** मोबाईलवर होणारे संभाषण त्याच्या परवानगीशिवाय रेकॉर्ड करणे खासगीपणाचे उल्लंघन आहे. मग ते पती-पत्नीमधील संभाषण असले तरी अयोग्य असल्याचे छत्तीसगड उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

संबंधित व्यक्तीच्या परवानगीशिवाय केलेले कॉल रेकॉर्डिंग हे संविधानाच्या अनुच्छेद २१ चे उल्लंघन आहे. न्यायालयाने एका महिलेच्या याचिकेवर सुनावणी करताना हा निर्णय दिला आहे. महिलेने याचिकेत दावा केला होता की, कौटुंबिक न्यायालयाने आदेश देऊनही पती तिला पोटगी देत नाही. महासमुंद जिल्ह्याच्या कौटुंबिक न्यायालय २०१९ मध्ये पत्नीला पोटगी देण्याचे आदेश पतीला दिले होते.

पतीने कौटुंबिक न्यायालयामध्ये याचिकेवर पुनर्विचार करण्याची मागणी केली होती. त्याचे म्हणणे होते की, त्याच्याकडे पत्नीसोबत झालेल्या संभाषणाचे रेकॉर्डिंग आहेत. कोर्टाने ही रेकॉर्डिंग ऐकावी. २१ ऑक्टोबर २०२१ ला कौटुंबिक न्यायालयाने पतीला रेकॉर्डिंग सादर करण्यास परवानगी दिली होती. यावरून २०२२ मध्ये महिलेने न्यायालयात धाव घेतली होती. तिने न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले होते.

पत्नीचे रेकॉर्डिंग ऐकायला लावून पती तिला व्यभिचारी असल्याचे सिद्ध करू पाहत होता. महिलेचे दुसऱ्या पुरुषाची संबंध आहेत. त्यामुळे पत्नीला पोटगी देण्याची काही आवश्यकता नाही, असे पतीचे म्हणणे होते. यावेळी महिलेच्या वकिलाने न्यायालयात सांगितले की, याचिकाकर्त्याच्या खासगीपणाचे उल्लंघन केले आहे.

# पुण्यातील गुहिणी पहिले 'मधाचे गाव' होणार



■ पुणे

**महाराष्ट्रातील** पहिले मधाचे गाव म्हणून पुण्याच्या भोर तालुक्यातील गुहिणी गावाची निवड होणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने या गावाच्या परिसराची पाहणी करत परिस्थितीचा आढावा घेतला. मंडळाचे सभापती रवींद्र साठेंच्या संकल्पनेनुसार राज्यात १० मधांची गावे करण्याचा मानस आहे.

महाराष्ट्रातील मधाचे गाव संकल्पना राबविण्यासाठी गुहिणी गावाची निवड होण्यासाठी मधकेंद्र योजनेअंतर्गत जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाबळेश्वर मध संचालनालयाचे संचालक डी. आर. पाटील, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी एस. आर. खरात, वेल्हे येथील तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास या सामाजिक संस्थेचे व्यवस्थापक रमेश आंबेकर, गावातील पदाधिकारी, ग्रामस्थ व मधपाळ उपस्थित होते. महाबळेश्वर मध संचालनालयाचे संचालक पाटील यांनी मधकेंद्र योजनेची आणि मधाचे गाव ही संकल्पना राबवण्याची माहिती दिली. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी खरात यांनी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य विकास योजना, मधकेंद्र योजना, मधाचे गाव याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर संचालक पाटील यांच्या हस्ते येथील जंगल परिसरामध्ये जांभुळ या वनस्पतीचे वृक्षारोपण करण्यात आले

# पुण्याच्या नवले पुलावर भीषण अपघात

## कंटेनरला धडकलेल्या ट्रकला आग! ४ ठार

■ पुणे

**समृद्धी** महामार्गावरील अपघाताची घटना ताजी असतानाच आज पुण्याच्या नवले पुलावर कंटेनरवर ट्रक आदळून झालेल्या भीषण अपघातात चौघांचा



मृत्यू झाला तर दोघांना वाचवण्यात यश आले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

आज रात्री ९ च्या सुमारास मुंबई - बंगळुरू महामार्गावरील पुण्याच्या नवले पुलावर स्वामी नारायण मंदिरा जवळ एक कंटेनर उभा होता. याच कंटेनरला मागून आलेल्या ट्रकने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की, ट्रकने पेट घेतला. यावेळी ट्रकमधील ड्रायव्हरच्या कॅबिनमध्ये ६ प्रवासी बसलेले होते. त्यातील चौघांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये एका लहान मुलींचाही समावेश असल्याचे समजते. तर मदतीसाठी धावलेल्या आसपासच्या लोकांनी दोघांना ट्रकमधून कसेबसे बाहेर काढले. मात्र ते जखमी असून, त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली. दरम्यान नवले पुलावर सतत होणाऱ्या या अपघाताबद्दल पुणेकरांनी संताप व्यक्त केला आहे.

# भिवंडीमध्ये तलावात बुडून २ अल्पवयीन मुलांचा मृत्यू

■ ठाणे

**मित्रांसोबत** तलावात पोहायला गेलेल्या दोन अल्पवयीन मुलांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. मृत मुलांमध्ये सात वर्षांचा मुलगा तर बारा वर्षांच्या मुलीचा समावेश आहे. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

वसीम मलिक (७) व अंजुम फत्ते (१२) अशी मृत मुलांची नावे आहेत. वसीम हा भिवंडी तालुक्यातील वडपा धामणगाव धापशीपाडा येथे आपल्या नातेवाईकांकडे गेला होता. रविवारी दुपारी वसीम आपली नातेवाईक असलेली अंजुम व इतर दोन साथीदारांसह वडपा धामणगाव येथे साचलेल्या ओहोळात पोहायला गेले होते. यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने वसीम आणि अंजुम दोघेही पाण्यात बुडाले. बाजूला उभ्या असलेल्या दोन साथीदारांनी आरडाओरड केल्याने येथून जाणाऱ्या एका वाहन चालकाने मुलांचा आवाज ऐकून गाडी थांबवली आणि मुलांना पाण्यातून बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालयात नेले. मात्र उपचारापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# सदावर्तेंविरोधात मराठा समाजाची धाराशिव पोलिसांत तक्रार

■ धाराशिव

**मराठा** आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथील अंतरवाली सराटी गावात मनोज जरांगे यांनी भव्य सभा घेतली. या सभेतून त्यांनी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्यावर टीका करत समाचार घेतला होता. जरांगे यांच्या टीकेला उत्तर देतांना अंतरवालीत झालेली सभा नसून जत्रा होती असे सदावर्ते यांनी म्हटले होते. यावरून सदावर्ते यांच्याविरुद्ध धाराशिव जिल्ह्यातील कळंब सकल मराठा समाजाच्या वतीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांना देण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, जरांगे यांच्या सभेसाठी मराठा समाज एकवटला व या सभेतील गर्दी ही कुठल्याही कॅमेऱ्यात व छायाचित्रातही मावणार नाही इतकी प्रचंड होती. परंतु, गुणरत्न सदावर्ते या व्यक्तीने या सभेबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. त्यांनी ही सभा नसून जत्रा आहे असे वक्तव्य केल्याने मराठा समाजामध्ये संतापाची लाट निर्माण झाली असून तातडीने सदावर्ते यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात यावा.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन

■ मुंबई

**प्रमोद** महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र ही संकल्पना राज्यातील तरुणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील ग्रामीण भागातील तरुणांच्या रोजगार संधी आणि त्यांना स्वावलंबी करण्याला प्राधान्य दिले आहे. अशा या महाराष्ट्राच्या अभिनव संकल्पनेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे, ही बाब देखील गौरवाची आहे. त्यामुळे हा कार्यक्रम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी नियोजन करा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले.

राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १९ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत राज्यातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासमवेत दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून (ऑनलाईन) बैठक झाली. मुख्य सचिव मनोज सौनिक, महसूल व वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगापोल देवरा, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, माहिती व जनसंपर्क महासंचालनाच्या महासंचालक जयश्री भोज आदी उपस्थित होते. कौशल्य विकास आयुक्त डॉ. ए. रामास्वामी यांनी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांच्या या संकल्पनेबाबत आणि उद्घाटन सोहळ्याच्या तयारीची माहिती सादर केली.

हा उद्घाटन सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या जिव्हाळ्याच्या विषयांशी संबंधित असल्याने त्याच तोलामोलाचा व्हावा, असे नमूद करून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, तरुणांच्या रोजगार संधी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारे हे महत्त्वाचे पाऊल आहे.

# मुंडेंच्या कारखान्यातील कर्मचाऱ्यांचा आत्मदहनाचा प्रयत्न

■ लातूर

**पंकजा** मुंडेंच्या पन्नगेश्वर साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी मागील १५ महिन्यांपासून थकलेला पगार मिळावा यासाठी आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला. कर्मचाऱ्यांनी अंगावर पेट्रोल, डिझेल ओतून घेतले. यावेळी पोलिसांनी कारखान्याच्या २४ कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले.

लातूर जिल्ह्यातील पानगाव येथील पन्नगेश्वर साखर कारखान्याच्या चेअरमन आणि कार्यकारी संचालक प्रजा गोपीनाथराव मुंडे आहेत. तर मार्गदर्शक पंकजा मुंडे आहेत. कारखान्यातील सुरक्षा विभागातील आणि इलेक्ट्रीशियन वायरमन यांचा १५ महिन्यांपासून पगार थकीत आहे. याबाबत कारखाना प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रार करूनही पगार मिळू शकला नाही. थकीत पगार मिळावा आणि भविष्य निर्वाह निधी जमा व्हावा यासाठी कर्मचाऱ्यांकडून पाठपुरावा सुरू होता. पगार आणि ईपीएफ जमा व्हावा अन्यथा कारखान्याच्या गेट समोर सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा साखर आयुक्त, जिल्हाधिकारी, तहसीलदारांसह कारखाना प्रशासनाा २१ दिवसांपूर्वी एका निवेदनाद्वारे दिला होता.


**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | १२.०१.२००९ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U15209MH2009PTC189530 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | जी-१, अविष्कार एम्प्रेस, के. डब्ल्यू. चितळे पथ, पोर्तुगिज चर्चच्या मागे, दादर (प), मुंबई - ४०००२८, महाराष्ट्र, भारत. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | १३.१०.२०२३ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | १३.१०.२०२३ |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | श्री. प्रशांत जैन<br>नोंदणीकरण क्र.<br>IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः एप५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९बी/१०, सेक्टर ११, कोपरखैरणे, ठाणे, नवी मुंबई - ४००७०९.<br>ईमेल आयडीः ipprashantjain@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | स्सार्वी रिझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी<br>पत्ताः बी-६१०, बीएसईएल टेकपार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्थानकासमोर, नवी मुंबई - ४००७०३.<br>वेबसाईटः www.ssarvi.com<br>ईमेल : liqnanai@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १२.११.२०२३ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. १३.१०.२०२३ रोजी **ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेडचे** परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
**ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेडच्या** भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे दि. **१२.११.२०२३** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**
जर भागधारकाने त्यांचे दावे परिसमापन प्रक्रियेदरम्यान सादर न केल्यास, भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ अन्वये कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेदरम्यान अशा भागधारकाद्वारे सादर केलेले दावे, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम ३८ अन्वये सादर करण्यात आल्याचे मानले जाईल.

सही/-
दिनांकः १७.१०.२०२३ **श्री. प्रशांत जैन**
ठिकाणः मुंबई नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
**ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात**
परिसमापक



**जाहीर सूचना**

सूचना देण्यात येते की, आमच्या सदस्या सौ. **एम. के. अनिता** यांनी त्यांच्या सदनिका क्र. सी-१०२, १ला मजला, इंदिरा अपार्टमेन्ट्स गोवंडी सीएचएस लि., यू.एस. विटामिन इंडिया लि.समोर, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू), मुंबई ४०० ०८८च्या संदर्भात क्र. १४६ ते १५० धारण केलेल्या ५ समभागांकरिताच्या त्यांच्या हरवलेल्या/गहाळ झालेल्या मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ३० ऐवजी दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याकरिता संस्थेकडे अर्ज केला आहे.
सदर हरविलेल्या/गहाळ झालेल्या भाग प्रमाणपत्रावर कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्ती/प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात आम्हाला कागदोपत्री पुराव्यांसह आमच्या संस्थेच्या कार्यालयात सदर प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास त्यावर कोणतेही दावे नाहीत असे मानण्यात येईल आणि संस्था दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करेल. जर कोणताही दावा/वे सदर १५ दिवसांच्या कालावधीनंतर प्राप्त झाल्यास, ते सोडून दिले आणि त्याग केले असे समजण्यात येईल.

(मान. सचिव) एम. व्ही. मिश्रा
मोबा. क्र. ९८६९०५०५११
**इंदिरा अपार्टमेन्ट्स गोवंडी सीएचएस लि.** करिता, यू.एस. विटामिन इंडिया लि.समोर, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू), मुंबई ४०० ०८८.



**जाहीर सूचना**

सूचना देण्यात येते की, आमचे सदस्य **विद्याधरन रामन** यांनी त्यांच्या सदनिका क्र. सी-१०१, १ला मजला, इंदिरा अपार्टमेन्ट्स गोवंडी सीएचएस लि., यू.एस. विटामिन इंडिया लि. समोर, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू), मुंबई ४०० ०८८च्या संदर्भात क्र. १४१ ते १४५ धारण केलेल्या ५ समभागांकरिताच्या त्यांच्या हरवलेल्या/गहाळ झालेल्या मूळ भाग प्रमाणपत्र क्र. २९ ऐवजी दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याकरिता संस्थेकडे अर्ज केला आहे.
सदर हरविलेल्या/गहाळ झालेल्या भाग प्रमाणपत्रावर कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्ती/प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात आम्हाला कागदोपत्री पुराव्यांसह आमच्या संस्थेच्या कार्यालयात सदर प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास त्यावर कोणतेही दावे नाहीत असे मानण्यात येईल आणि संस्था दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करेल. जर कोणताही दावा/वे सदर १५ दिवसांच्या कालावधीनंतर प्राप्त झाल्यास, ते सोडून दिले आणि त्याग केले असे समजण्यात येईल.

(मान. सचिव) एम. व्ही. मिश्रा
मोबा. क्र. ९८६९०५०५११
**इंदिरा अपार्टमेन्ट्स गोवंडी सीएचएस लि.** करिता, यू.एस. विटामिन इंडिया लि.समोर, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू), मुंबई ४०० ०८८.


# मध्य प्रदेशात इंडिया आघाडीत फूट? काँग्रेसचा समाजवादी पक्षाला ठेंगा

**१४४ उमेदवारांची यादी जाहीर केली**

■ भोपाळ

**पाच** राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत जागावाटप हा इंडिया आघाडीसाठी कळीचा मुद्दा बनला आहे. मध्य प्रदेशात एकीकडे आम आदमीने सर्व जागा लढवण्याचा निर्णय घेतला आहे, तर दुसरीकडे काँग्रेसने समाजवादी पक्षाच्या जागांवरही आपले उमेदवार उभे केले आहेत. त्यामुळे अखिलेश यादव संतप्त झाले आहेत. परिणामी मध्य प्रदेशात इंडिया आघाडीत मोठी फूट पडण्याची शक्यता आहे.

मध्य प्रदेश विधानसभेच्या २३० जागांसाठी १७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. सत्ताधारी भाजपने सर्व जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. आज काँग्रेसनेही १४४ उमेदवारांची यादी जाहीर केली, पण या यादीत समाजवादी पक्षाच्या काही जागाचाही समावेश आहे. २०१८ च्या निवडणुकीत समाजवादी पक्षाने जिंकलेल्या ३ जागांवरही काँग्रेसने उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेसच्या विरोधात समाजवादी पक्षात संतापाची लाट उसळली आहे. आता काँग्रेसला धडा शिकवण्यासाठी समाजवादी पक्षही आम आदमी पक्षाप्रमाणेच सर्व जागा लढवण्याचा विचार करीत आहे. त्यामुळे मध्य प्रदेशात इंडिया आघाडीत फूट पडण्याची शक्यता आहे.


**अनुसूची I**
**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
*(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)*

**डेमिनेंशन्स ट्रेड अँड कॉमर्स लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | रमेश गोयंका फाऊंडेशन |
| २. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक | २८.०६.२०१३ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई (कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय) |
| ४. | कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U85100MH2013NPL244947 |
| ५. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ५ वा मजला, बी विंग, सुआशिष आयटी पार्क, सीटीएस क्र. ६८/ई, ऑफ दत्तपाडा रोड, राजेंद्र नगर, टाटा स्टील कं. समोर, बोरीवली पूर्व, मुंबई ४०००६६, महाराष्ट्र भारत. |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | ३ ऑक्टोबर, २०२३ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणीकरण क्रमांक | नावः गिरिश के. हिंगोरानी<br>पत्ताः ५सी मेहता सदन, एस एच परेलकर मार्ग, दादर, मुंबई ४०००२८.<br>ईमेलः girish2207@rediffmail.com<br>मोबाईल क्र.: ९८२००९९७८३<br>नोंद. क्र.: IBBI/IPA-002/IP/N00842/2019-2020/12695 |
| ८. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १५ नोव्हेंबर, २०२३ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, रमेश गोयंका फाऊंडेशनने दि. ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया सुरू केली आहे.
रमेश गोयंका फाऊंडेशनच्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे दि. १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.
गिरिश क्रिष्णा हिंगोरानी
परिसमापक
दिनांकः १७.१०.२०२३
ठिकाणः मुंबई


# पुण्यात नवरात्रनिमित्त वाहतुकीत बदल

■ पुणे

**पुणे** शहरात नवरात्र उत्सवात भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता यावे आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी २४ ऑक्टोबरपर्यंत पोलिसांनी वाहतूक व्यवस्थेत बदल केले आहे. त्यामुळे नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी सांगितले की, अप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे जाणारा रस्ता वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. बुधवार चौक ते अप्पा बळवंत चौक अशी एकेरी वाहतूक सुरू राहील. पर्यायी मार्ग- अप्पा बळवंत चौक, गाडीतळ पुतळा येथून छत्रपती शिवाजी महाराज रस्त्याने इच्छित ठिकाणी जाता येईल. भवानी माता मंदिरासमोरील महात्मा फुले रस्त्यावर वाहतूक दोन्ही बाजूंनी बंद करण्यात येणार आहे. या रस्त्यावर वाहनांना नो-पार्किंग राहील. वाहनचालकांनी पार्किंग झोनमध्ये वाहने पार्क करावीत. रामोशी गेट चौकाकडून भवानी माता रस्त्याने जाणाऱ्या वाहनचालकांना ए .डी. कॅम्प चौकातून डावीकडे वळून जावे लागेल. भवानी माता मंदिर रस्त्यावरून जुना मोटार स्टँडकडे जाणाऱ्या वाहनचालकांना भगवान बाहुबली चौकातून जावे लागेल.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा सुचना क्र. ३२ (ई- निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, चिपळूण हे (दुरध्वनी क्र.०२३५५ - २५२८०६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या कंत्राटदारांकडून कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई- निविदा सुचना **www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in** पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप :- या निविदेमध्ये एकुण १ ते २६ कामे समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १७.१०.२०२३ सकाळी १०.०० ते दि. ३१.१०.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या निविदेमधील संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. **www.mahatenders.gov.in.**

**जा. क्र. सीएचडी / एबी / टीसी /५३२५**
**कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,**
**चिपळूण सा.बां. विभाग, चिपळूण.**
**रत्नागिरी ४१५००५ (०२३५५) २५२८०६**
**दिनांक :- ११/१०/२०२३**
क्रमांकः आरओसी/२०२३-२४/क्र-५/सी ४२२२

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**चिपळूण सा.बां. विभाग चिपळूण**

